मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# काँग्रेस आघाडी 'समस्या'..तर भाजपा महायुती 'समाधान'..!

## उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा 'भगवा प्रहार' : महायुतीचे उमेदवार आमदार महेश लांडगे प्रचारासाठी विराट सभा

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारताचा पाया सनातन आहे आणि सनातवर प्रहार हा महाविनाशाला आमंत्रण आहे. 'बटेंगे तब कटेंगे.. अब बटेंगे नहीं... एक रहेंगे तो सेफ रहेंगे'. काँग्रेस सत्ताकाळात पाकिस्तान भारतात घुसखोरी आणि आतंकी हल्ले करीत होता. आम्ही संसदेत आवाज उठवत होतो. त्यावेळी पाकिस्तानशी संबंध बिघडतील म्हणून काँग्रेस यामुद्द्यावर बोलू नका, अशी भूमिका घेत होते. मात्र, आता नवा भारत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात नवा भारत म्हणजे "हम छेडेंग नहीं लेकीन हमें छेडेंगे तो छोडेंगे नहीं" असा संदेश जगभरात गेला आहे. हा नवा भारत आहे. घुसखोरी कराल, तर घुसून मारण्याची हिंमत ठेवतो. देशाच्या समस्येचे कारण काँग्रेस आघाडी आहे, तर समस्यांवरील समाधान भाजपा महायुती आहे, असा घणाघात उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केला.

भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपा-शिवसेना- एनसीपी- आरपीआय- मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारासाठी भोसरी येथील गावजत्रा मैदानावर रविवारी विराट सभा झाली. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि सभेला सुरूवात झाली.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, गुजरातचे माजी मंत्री प्रदीज जडेजा, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, प्रखर हिंदुत्ववादी डॉ. मिलिंद एकबोटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, मंगला कदम, ज्येष्ठ नेते वसंत लोंढे, हभप दत्तात्रय गायकवाड, राष्ट्रवादीच्या कविता आल्हाट, शिवसेनेचे संभाजी शिरसाट, आरपीआयच्या चंद्रकांता सोनकांबळे, भाजपाचे शत्रुघ्न काटे, सुजाता पालांडे यांच्यासह महायुतीचे सर्व नेते, पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते आणि हजारो नागरिक उपस्थित होते.

योगी आदित्यनाथ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यभूमिला नमन करतो. महाराष्ट्रात नवीन सरकार बनवण्यासाठी निवडणूक होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात महायुती गठबंधन आहे. गेल्या १० वर्षांत नवा भारत निर्माण होत आहे. 'सबका साथ सबका विकास' या भावनेतून देशाची प्रगती सुरू आहे. कुणाचे तुष्टीकरण केले जात नाही. भारताला जोडणाऱ्या शक्ती 'एक भारत श्रेष्ठ भारत' विचाराने महागठबंधन म्हणून एकत्र आल्या आहेत. दुसऱ्या बाजुला 'महाअनाडी गठबंधन' आहे. ज्यांच्याकडे निती, नियत आणि निर्णय घेण्याची क्षमता आणि सामर्थ्य नाही. "सबका साथ लेकीन परिवारका विकास" असा ज्यांचा नारा आहे. त्यांनी भारताच्या विकासाचा विचार केला नाही.



### महाराष्ट्राबाबत संपूर्ण देशाला कृतज्ञता...

» महाराष्ट्राबाबत संपूर्ण देशवासीयांमध्ये कृतज्ञता भाव आहे. हिंदवी स्वराज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या भूमित करुन दाखवली. अटक ते कटक अखंड भारत कसा असावा, याची शिकवण पेशवा बाजीराव यांनी दिली. 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे' असे सांगणारे लोकमान्य बाळगंगाधर टिळक, सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकता संदेश देणारे महात्मा फुले, महिला शिक्षण भारताच्या सक्षमीकरणाचा आधार असेल असा संदेश देणाऱ्या सावित्रीबाई फुले, 1857 चे बंड हा भारताचा प्रथम स्वातंत्र्य लढा आहे असे सांगणारे स्वातंत्र्यवीर सावरकर, 'एक विधान सब है समान' असे संविधान देणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सारखे महामानव देशाला देणारा हा महाराष्ट्र आहे. त्यामुळे या राज्याप्रती देशवासीयांना कृतज्ञता वाटते, अशा भावना योगी आदित्यनाथ यांनी व्यक्त केल्या आहेत.

### काँग्रेसचा सत्ता लालसेमुळेच अखंड भारताचे विभाजन...

» काँग्रेसने सत्तेची लालसा ठेवली नसती, तर 1947 मध्ये अखंड भारत देशाचे विभाजन झाले नसते. भारत एकसंघ राहिला असता, लाखो निर्दोश हिंदू लोकांची कत्तल झाली नसती. 'हिंदू-मुस्लिम' अशी समस्या निर्माण झाली नसती. हिंदू-मुस्लिम समस्या भारताच्या विभाजनामुळे सुरू झाली. अखंड भारतात अशी समस्या निर्माण जरी झाली असती, तरी आज से आम्ही समस्येचा निपटारा करीत आहोत, तसाच हिंदू-मुस्लिम समस्येचा निपटारा केला असता. मात्र, काँग्रेसच्या सत्तालोलूपता आणि तुष्टिकरणाच्या भूमिकेमुळे देशाचे विभाजन झाले. स्वातंत्र्यानंतर जात-प्रांत अशा मुद्दांवर देशाचे विभाजन करण्यात आले, असा दावाही मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केला.

---

# लिंक रोड, चिंचवड स्टेशन, आनंदनगर येथे आमदार अण्णा बनसोडे यांची पदयात्रा

## फुलांची उधळण करत स्वागत अन् औक्षण करत माता-भगिनींनी दिले आशीर्वाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले), रासप या महायुतीचे पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांनी शनिवारी (दि.16) लिंक रोड चिंचवड, आनंदनगर, गवळी वाडा येथे प्रचार फेरी काढली. यावेळी उपस्थितांनी आमदार अण्णा बनसोडे हेच पुन्हा आमदार होतील, असा सूर आवळला. ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक, फुलांची उधळण करत स्वागत अन् औक्षण करून महिला आणि ज्येष्ठांनी आमदार अण्णा बनसोडे यांना आशीर्वाद दिले.

चिंचवड स्टेशन येथील गावडे पार्क, गावडे कॉलनी, भोईर कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे कॉलनी, गणेश नगर, श्रीधर नगर, गोलांडे इस्टेट, गावडे नगर, लक्ष्मी नगर, देवधर सोसायटी, जीवन नगर, धोका कॉलनी, एसकेएफ कॉलनी येथे प्रचार सभा काढली.

यावेळी आमदार उमा खापरे, सदाशिव खाडे, शितल शिंदे, निलेश डोके, राजेंद्र साळुंखे, जयश्री गावडे, दीपक मेवानी, अनिकेत गावडे, महेश कुलकर्णी, प्रसाद शेट्टी, शैलेश मोरे, अपर्णा डोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

आनंदनगर येथील प्रचार फेरीत शैलेश मोरे, हरीश ललवाणी, मनोहर पाटील, दीपक मेवाणी, जयश्री गावडे, जयदीप ठाकरे, प्रसाद शेट्टी, काळूराम पवार, प्रदीप साळवे, ज्योती शिंदे, रशिकांत कदम, किरण गायकवाड, राजेश अग्रवाल, यल्लाप्पा शेट्टी, कुमार आईगुळे, शिवकुमार केंगारे, आकाश शिंदे, संतोष सुरवसे, राहुल पांडे, सोनाली शिंदे, ताई गायकवाड, रवी गायकवाड, राजेश गायकवाड आदी उपस्थित होते.

आनंदनगर येथून आमदार अण्णा बनसोडे यांनी महापालिकेची पहिली निवडणूक लढवली होती. त्यामुळे आनंदनगर आणि अण्णा बनसोडे हे अतिशय जिव्हाळ्याचे नाते आहे. इथल्या नागरिकांना आमदार अण्णा बनसोडे यांचेच नेतृत्व आमदार म्हणून निवडून द्यायचे आहे, असे नागरिकांनी सांगितले. आनंदनगर प्रमाणेच शहराच्या विविध भागात आमदार अण्णा बनसोडे यांना मताधिक्य मिळवून देण्याचे ठरले असल्याचे नागरिक सांगतात.



# डॉ.सुलक्षणा शिलवंत यांची मोहननगर परिसरात भव्य रॅली

## प्रचार अधिक प्रभावी करण्यासाठी भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या अधिकृत उमेदवार डॉ. सुलक्षणा शिलवंत यांचा कडून विधानसभा निवडणूक प्रचार अधिक प्रभावी करण्यासाठी भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रामनगर येथे माजी उपमहापौर दिनकरराव दातीर पाटील यांची भेट घेऊन प्रचार दौऱ्याची सुरुवात केली. त्यांनतर पुढे रामनगर मंदिर, विद्यानगर गणेश मंदिर आणि श्री पावन अंबिका माता प्रतिष्ठान, पुढे दत्तवाडी परिसरातील नागरिकांना भेट देत संध्याकाळी शाहूनगर पर्यंत पोहोचलेल्या या प्रचार रॅलीला नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. ज्यामध्ये पक्षाचे नेते, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. रॅलीदरम्यान डॉ.सुलक्षणा शिलवंत यांनी जनतेशी संवाद साधला आणि आपल्या पक्षाच्या धोरणांची माहिती दिली. यावेळी नागरिकांशी संवाद साधून आपण मला संधी द्या, मी या संधीचे सोने करेन असा विश्वास दिला.

संजोग वाघेरे पाटील, ॲड. गौतम चाबुकस्वार, संदीप चव्हाण, दत्ता मोरे, अरुण म्हात्रे, गणेश दातीर पाटील, सतीश भोसले, अविनाश दातीर पाटील, राम पात्रे, विठ्ठल कळसीत, दयानंद मोरे, सुजित रासकर, तात्यासाहेब धुमाळ पांडुरंग पाटील, शिवसेनेचे मेजर साळुंखे, शिवसेना विभाग प्रमुख गोपीचंद जगताप, आदींसह शिवसेना आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचार दौऱ्यादरम्यान शाहूनगर येथे कार्यकर्ते आणि समर्थकांनी भव्य बाईक रॅलीचे आयोजन करून उत्साहात स्वागत केले. यावेळी परिसरातील साई मंदिर, महालक्ष्मी मंदिर, महादेव मंदिर आणि गणेश वसंत बाळूमामा देवस्थान मंदिरात दर्शन घेऊन परिसरातील नागरिकांशी संवाद साधला.




# मलिदा लाटण्यासाठी 'सारथी' च्या संचालकांची माघार?

## निविदा प्रकरणी समान धोरण समितीतून बाहेर पडण्याची भूमिका, विद्यार्थ्यांचा संताप, मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचाही आरोप

**पुणे | प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्थेकडून (सारथी) यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग आणि एसएससी आदी स्पर्धा परीक्षांचे पूर्वप्रशिक्षण दिले जाते. पूर्वप्रशिक्षण देण्यासाठी या संस्थेकडून निविदा प्रक्रिया राबवण्यात येते. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांनी खासगी क्लासच्या संस्था निवडाव्यात, यासाठी राज्य शासनाने समान धोरण समिती स्थापन केली आहे.

या समितीतून निविदा प्रक्रिया राबवणे अपेक्षित असताना सारथी संस्थेने या समितीतून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अद्याप कोणतेही प्रशिक्षण मिळालेले नाही. सारथी संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालकांनी हा निर्णय केवळ काही संस्थांच्या माध्यमातून मलिदा लाटण्यासाठीच केला असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे.



### संचालकांच्या निष्काळजी कारभाराचा संस्थेला फटका

» शासनाने निविदा प्रक्रियेतील गैरव्यवहारांवर आळा घालण्यासाठी पहिल्यांदाच समान धोरण राबवले. यामुळे बार्टी, सारथी, महाज्योती, आणि टीआरटीआयमध्ये समानता येण्यासाठी आणि अधिक दर्जेदार, गतिमान आणि पारदर्शकतेने काम होण्यासाठी सर्वांची मिळून एक समिती नेमली. समान धोरण नियमावलीची जबाबदारी घेण्यास सर्व महासंचालकांनी उदासीनता दाखवली आहे. सारथीच्या निष्काळजीपणामुळे आणि अकार्यक्षमतेमुळे सुमारे ५ हजार मराठा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान होणार आहे. विद्यार्थी विद्यावेतन, कोचिंग यापासून वंचित राहतील. याला सर्वस्वी जबाबदार सारथीची ढिसाळ प्रशासकीय यंत्रणा आणि त्याचे हे निष्काळजी संचालक आहेत. नवीन संस्था जोडण्यापेक्षा जुन्याच संस्थांवर जबाबदारी सोपवण्यामागे जुन्या संस्थांबरोबरच्या 'अर्थपूर्ण' संबंध कारणीभूत आहेत. विद्यार्थ्यांकडून इतर नामवंत आणि दर्जेदार संस्थांना मागणी व पसंती आहे. मग त्यांना वंचित ठेवण्याचा हा डाव तर नसेल ना, अशी शंका येत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

> समान धोरण समितीच्या सूचनेनुसार निविदा प्रक्रियेत भाग घेतल्यास गोंधळ होऊ शकतो. तसेच या प्रक्रियेत अनेक त्रुटी आहेत. त्यामुळे सारथीने यात सहभागी होऊ नये, अशा तक्रारी सारथीकडे आल्या आहेत. काही वकिलांनी सारथीला नोटीसही पाठवली आहे. त्यामुळे या प्रक्रियेतून बाहेर पडावे किंवा कसे याबाबतचे मार्गदर्शन करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला आहे. विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यांच्या प्रशिक्षणातील कालावधी कमी केला जाणार नाही. सारथी कोणत्याही प्रक्रियेतून बाहेर पडलेली नाही. राज्य शासनाचे मार्गदर्शन मागवले आहे. त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार आहे.
>
> **- अशोक काकडे, व्यवस्थापकीय संचालक, सारथी**

> सारथी संस्था मोठ्या संघर्षातून उभी राहिली, ती रसातळाला नेण्याचे काम हे महासंचालक करत आहेत. त्यांच्या हलगर्जीपणामुळे कोट्यवधी रुपयांचे बजेट परत गेले आहे. त्यांच्या योजना नेहमीच वेगळ्या असतात; इतरांनी केलेल्या गोष्टी ते कधी करत नाहीत. ते धरसोड वृत्तीचे आणि एककलमी भूमिका घेणारे आहेत. कोणताही प्रशिक्षण कार्यक्रम गोगलगाईच्या वेगाने राबवण्यात त्यांचा हातखंडा आहे. सामान्य विद्यार्थ्यांना भेटणे ते नेहमीच टाळतात. समान धोरणातून बाहेर पडण्याची भूमिका केवळ खासगी क्लासचालकांच्या माध्यमातून मलिदा खाण्यासाठी घेतली जात आहे. सारथीच्या संचालकांना विद्यार्थ्यांच्या हितापेक्षा आर्थिक लाभ महत्त्वाचा वाटत आहे.
>
> **- ॲड. कुलदीप आंबेकर, अध्यक्ष- स्टुडंट हेल्पिंग हँड्स**

राज्य शासनाकडून वंचित घटकातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षांचे पूर्वप्रशिक्षण देऊन उमेदवारांचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी विविध समाजासाठी संस्थांची स्थापना केली आहे. टीआरटीआय, बार्टी, महाज्योती आणि सारथी अशा संस्था विद्यार्थ्यांसाठी काम करत आहेत. या संस्थांना राज्य शासनाकडून निधी दिला जातो. त्यानुसार विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी योजना राबवल्या जातात. स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी विविध परीक्षांसाठी पूर्वप्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी या संस्थांकडून निविदा प्रक्रिया राबवण्यात येत होती. त्यानुसार विद्यार्थ्यांना संबंधित संस्थेत प्रवेश दिला जात होता.

# निवडणूक कर्तव्यावरील आठ हजार कर्मचाऱ्यांनी केले मतदान

## प्रशासनाच्यावतीने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा केंद्रावर टपाली मतदानाद्वारे मतदानाचा हक्क बजावला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीकरीता कर्तव्यावर असलेल्या एकूण ८ हजार २७२ अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रशासनाच्यावतीने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा केंद्रावर टपाली मतदानाद्वारे मतदानाचा हक्क बजावला आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.




जिल्ह्यात नमुना १२ भरून दिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्याच्या टपाली मतदानाकरीता १४ नोव्हेंबर अखेर सुमारे १६ हजार मतपत्रिका प्राप्त झालेल्या आहेत, त्यापैकी जुन्नर विधानसभा मतदारसंघात-१३२, आंबेगाव-१४१, खेड-आळंदी-२३१, शिरूर-४००, दौंड-१ हजार २५१, इंदापूर-६०३, बारामती-५२१, पुरंदर-३२०, भोर-७०७, मावळ-३५०, चिंचवड- १ हजार ७२, पिंपरी-४७७, भोसरी-८२, वडगाव शेरी-३४७, शिवाजीनगर-३८२, कोथरूड-१८७, खडकवासला-६५१, पर्वती-१२७, हडपसर विधानसभा मतदारसंघात २९१ असे एकूण ८ हजार २७२ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात निवडणूक कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांचे टपाली मतदान नोंदिवण्याकरीता सुविधा केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. टपाली मतदान प्रक्रिया १९ नोव्हेंबरपर्यंत सुरु राहणार आहे, अशी माहिती डॉ. दिवसे यांनी दिले आहेत.

पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रशासनाच्यावतीने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा केंद्रावर टपाली मतदानाद्वारे मतदानाचा हक्क बजावला आहे, एकूण ८ हजार २७२ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.

# निवडणूक कामकाजाचे चित्रीकरण करुन प्रसारित केल्यास कठोर कारवाई : डॉ. सुहास दिवसे

## कोणाही व्यक्तीला मोबाईल, स्मार्टवॉच, इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेऊन येण्यास पूर्णत: बंदी आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

भोर विधानसभा मतदार संघातील ईव्हीएम व व्हीव्हीपॅट कमिशनींगच्या कामकाजाचे मोबाईलवरुन बेकायदेशीरपणे व्हिडीओ चित्रीकरण करुन समाज माध्यमांवर (सोशल मीडिया) प्रसारित केल्याबद्दल दोन उमेदवारांच्या प्रतिनिधींवर गुन्हा दाखल करुन पोलीसांनी ताब्यात घेतले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विकास खरात यांनी दिली आहे.



सरदार कान्होजी जेधे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोर येथे बुधवारी (दि. 13 नोव्हेंबर) ईव्हीएम व व्हीव्हीपॅट कमीशनींगचे कामकाज सुरु होते. यावेळी मोबाईल आदी उपकरणांना बंदी असताना उमेदवार शंकर हिरामण मांडेकर यांचे प्रतिनिधी विजय हनुमंत राऊत, रा. लवळे (ता. मुळशी) आणि कुलदिप सुदाम कोंडे यांचे प्रतिनिधी नारायण आनंदराव कोंडे रा. केळवडे (ता. भोर) यांनी बेकायदेशीरपणे मोबाईल घेऊन येऊन मॉकपोलचे चित्रीकरण करुन ते सोशल मीडियावर प्रसारित करुन गोपनियतेचा भंग केला. त्यामुळे विजय हनुमंत राऊत आणि नारायण आनंदराव कोंडे यांच्यावर 14 नोव्हेंबर रोजी भोर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.222/2024, बी.एन.एस.171(1), 223, आय.टी. ॲक्ट 72 नुसार गुन्हा दाखल केलेला आहे. या आरोपींना पोलीसांनी ताब्यात घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली आहे.

या घटनेचे गांर्भीय लक्षात घेता घेता जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था भोर येथे भेट देवून घटनेची माहिती घेतली, असेही डॉ. खरात यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी:- ईव्हीएम कमिशनींग, मतदान केंद्र, मतमोजणी केंद्र आदी ठिकाणी निवडणूक प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यादरम्यान निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी, कर्मचारी, उमेदवार, मतदान प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी, मतदार, वार्ताहर आदी कोणाही व्यक्तीला कोणताही मोबाईल, स्मार्टवॉच, इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेऊन येण्यास पूर्णत: बंदी आहे. तसेच निवडणूक कामकाजाचे व्हिडीओ तसेच छायाचित्रे काढून विविध व्हॉटस्ॲप ग्रुप, सोशल मीडियावर प्रसारित करणे हा गंभीर गुन्हा आहे. असे करणाऱ्यावर गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करण्यात येईल.

# विंटेज कार व बाईक प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## पिंपरी, चिंचवड आणि भोसरी मतदारसंघात मतदार जनजागृतीसाठी देशातील पहिलाच अनोखा प्रयोग

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात मतदानाचे प्रमाण वाढावे याबाबत जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्या वतीने शहरात पहिल्यांदाच "भव्य विंटेज कार आणि बाईक रॅली व प्रदर्शनाचे" आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ऐतिहासिक दुर्मिळ कार व बाईक्स पाहण्यासाठी नागरिकांनी एकच गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले.



सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदार संघात मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त तथा स्वीप नोडल विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली उप आयुक्त अण्णा बोडडे, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांच्या नियंत्रणाखाली मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने शनिवारी सायंकाळी संत तुकारामनगर येथील एच.ए. मैदानावर विंटेज कार आणि बाईक्स चे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावेळी कार व बाईक पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली.

महापालिकेच्या वतीने भरविण्यात आलेल्या विंटेज कार प्रदर्शनाचा हेतू मतदार जनजागृती करून शहरातील मतदानाचे प्रमाण वाढावे, हा असल्याचे मत अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी मांडले. मतदान करणे हे लोकशाहीतील मतदारांचे आद्य कर्तव्य असल्याचे देखील ते म्हणाले. यावेळी उप आयुक्त अण्णा बोडडे, रमेश डाळिंबे, देवेंद्र मोरे, ॲड अनंत पाटील, किसन केंगले, अभिजित डोळस, विकास गायकांबळे, ओंकार पवार, श्रेयश जाधव, पियुष घसिंग, सचिन महाज, महापालिकेचे कर्मचारी यांच्यासह विंटेज कार व बाईकधारक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, कोकणे चौक पिंपळे सौदागर येथून या विंटेज कार व बाईक रॅलीची सुरुवात अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त अण्णा बोडडे यांच्या हस्ते फ्लॅग दाखवून करण्यात आली. या रॅलीचा समारोप एच.ए.मैदानावर झाला व प्रदर्शनाला सुरुवात झाली. विंटेज कार व बाईक पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी जमल्याचे चित्र पाहायला मिळाले. तत्पूर्वी, जीएनडी ग्रुपच्या कलाकारांनी आपल्या नृत्याच्या माध्यमातून उपस्थितांना मतदान करण्याचे आवाहन केले. तर प्रतिभा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आणि ज्येष्ठ कलाकारांनी मतदार जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. यावेळी उपस्थित नागरिकांनी मतदान करण्याबाबत शपथ घेतली.

यावेळी मतदार जनजागृतीसाठी शहरातच नाहीतर देशात पहिल्यांदाच विंटेज कार प्रदर्शन भरविण्यात आले असल्याचे मत उपआयुक्त अण्णा बोडडे यांनी केले.

### विंटेज कार रॅली चित्रीकरणासाठी नागरिक रस्त्याच्या कडेला

कोकणे चौक ते एच.ए. मैदान या मार्गावरून विंटेज कार रॅलीचा प्रवास झाला. या रॅलीचे चित्रीकरण करण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक रस्त्याच्या कडेला उभे होते. काही नागरिकांनी चित्रीकरणासाठी रॅलीमध्ये सहभाग घेऊन चित्रीकरण करीत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### नागरिकांना आवरेना सेल्फी काढण्याचा मोह

» विंटेज कार प्रदर्शनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. यावेळी लहान मुले, तरुणांसह ज्येष्ठांना देखील सेल्फी काढण्याचा मोह आवरला नाही.

### नागरिकांकडून महापालिकेचे आभार

» स्वातंत्र्य पूर्व काळापासून ते अलीकडील काळातील ऐतिहासिक व दुर्मिळ विविध फियाट मॉडेल्स सह विविध कंपन्यांचे दुर्मिळ कार पाहण्याची संधी नागरिकांना महापालिकेने उपलब्ध करून दिली. यामध्ये फियाट बलीला १९३५, फियाट मिलीसिंटो १९५५, फियाट सिलेक्ट१९६०, फियाट सुपर सिलेक्ट १९६२, फियाट प्रेसिडेंट१९७५, फियाट प्रीमियर पद्मिनी१९८०, ११८ एनइ आदी बहुसंख्य कार व बाईक्स आदींचा समावेश होता. दुर्मिळ कार व बाईक्स प्रत्यक्ष पाहण्याचा अनुभव अविस्मरणीय असून त्यासाठी महापालिकेचे आभार, तसेच आम्ही मतदान करणार असून सर्व मतदारांनी आपला मताचा हक्क बजवावा असे आवाहन देखील प्रदर्शनात सहभागी झालेल्या नागरिकांनी केले.

# थेरगावकरांचा निर्धार राहुलदादांना करणार आमदार..!

## थेरगावकर ग्रामस्थ महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या खंबीरपणे पाठीशी

**पिंपरी | प्रतिनिधी**

थेरगावकर ग्रामस्थ महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या खंबीरपणे पाठीशी उभे राहिल्याचा प्रत्येय थेरगावातील परिवर्तन पदयात्रेत आला. या पदयात्रेत अबाल वृद्ध नागरिक महिला आणी युवकांनी रेकॉर्ड ब्रेक गर्दी केली होती. थेरगाव परिसरात कलाटे यांचे आगमन होताच हलगी तुतारीच्या कडाडणाऱ्या आवाजात, फटाक्यांची आतिषबाजी अन जागोजागी फुलांची पुष्पवृष्टी करत जोरदार स्वागत करण्यात आले. यंदा आमचं ठरलंय- वार फिरलंय, परिवर्तन घडणारच, राहुल दादा आमदार होणारच या घोषणांनी थेरगाव परिसर अक्षरशः दुमदमली.



राहुल कलाटे यांच्या प्रचारार्थ थेरगाव गणेश नगर मधील गणपती मंदिर, परिसरातील सर्व कॉलनी, पडवळ नगर, गुजर नगर, सोळा नंबर परिसर, अशोका सोसायटी, कैलास मंगल कार्यालय, धनगर बाबा मंदिर, तापकीर चौक, बारणे चौक, पदमजी पेपर मिल, दत्तनगर पूर्ण परिसरात परिवर्तन पद यात्रा काढण्यात आली. यावेळी, अनेक वर्ष या परिसरात प्रलंबित असलेल्या समस्यांचे गाऱ्हाणे नागरिकांनी मांडले. थेरगावकर जनतेला आता बदल हवा असून, यंदा विकासाचा नवा आश्वासक चेहरा आम्हाला हवा असल्याने यावेळेस थेरगावकर राहुल कलाटे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करणार अशी ग्वाही दिली.

यावेळी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, माजी नगरसेवक संपत पवार, मनोहर पवार, विशाल बारणे, विशाल पवार, संभाजी बारणे, शरद गुजर, नितीन पाडाळे, निखील गुजर, अमित गुजर, गणेश गुजर, दीपक तरडे, महेश बारणे, विनय बारणे, शरद बारणे, बबलू चांदणे, सुरेश गुजर, प्रकाश गुजर, विठ्ठल गुजर, दत्ता पोटे यांच्यासह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "थेरगावात प्राधिकरणाकडून महापालिकेकडे हस्तांतरित झालेली तसेच, सर्व समान्यांची अनाधिकृत हजारो घरे आहेत. हाच जिव्हाळ्याचा मुद्दा घेऊन प्रस्थापितांनी अनेक वर्षे नागरिकांना वेठ्यात काढण्याचे काम केले आहे. सत्ता असून देखील हा प्रश्न मात्र अद्याप त्यांना सोडवता आला नाही. त्यामुळे थेरगावकरांनी आशीर्वाद दिल्यास, येथील प्रश्न प्राधान्याने सोडवले जातील.
>
> - राहुल कलाटे, उमेदवार महाविकास आघाडी.

# त्रिकुट सरकारला आता बसवा घरी

## बापूसाहेब पठारे यांच्या प्रचार सभेमध्ये जयंत पाटील सत्ताधारी महायुतीवर बरसले

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता परांडे नगर, धानोरी येथे बापूसाहेब पठारे यांच्या प्रचारासाठी भव्य जनकल्याण जाहीर सभा घेतली. या सभेत जयंत पाटील यांनी त्रिकुट सरकारने राज्याचे अतोनात नुकसान केल्याने त्यांना शिक्षा करा, गद्दारांना शिक्षा करा, शिवाजी महाराजांचा पुतळा गलथान कारभाराने पाडणाऱ्यांना शिक्षा करा, विचारांची लढाई जिंका,असे तळमळीचे आवाहन केले. फडणवीस, शिंदे, अजित पवार हे भित्रे त्रिकुट असून भोपळा देणाऱ्यांना, श्रीमंतांची चाकरी करणाऱ्यांना महाराष्ट्राने अद्दल घडवली पाहिजे, असेही ते म्हणाले.

पोर्शे अपघात प्रकरणातील बळींना श्रध्दांजली वाहण्यासाठी जयंत पाटील यांनी स्वतःचा सत्कार बाजूला ठेवला. बापूसाहेब पठारे यांच्या नेतृत्व, जनसंपर्क,



आणि लोकांसाठी केलेल्या कामाचे त्यांनी जोरदार कौतुक केले. पठारे यांना प्रचंड बहुमताने निवडून देण्याचे आणि वडगाव शेरीचे नाव बदनाम करणाऱ्या आमदाराला घरी बसविण्याचे आवाहन त्यांनी या सभेत मतदारांना केले. महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांनी प्रचंड गर्दी केली होती. बापूसाहेब पठारे, जगन्नाथ शेवाळे, प्रकाश म्हस्के, जयदेव गायकवाड, रेखा टिंगरे, चंद्रकांत टिंगरे, स्वाती पोकळे, कैलास पठारे, जयवंत गोसावी, सुनील माने, सागर माळकर, सुनील खांदवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. अंबुज पार्टी, रिपब्लिकन डेमोक्रॅटिकसह अनेक पक्ष, व्यक्तींनी पाठिंबा जाहीर केला.

जयंत पाटील म्हणाले, "विकास करणारा आमदार हवा की विनाश करणारा आमदार हवा , हे तुम्ही राज्याला दाखवून दिले पाहिजे. बापूसाहेब पठारे हे एक कर्तबगार उमेदवार आहेत. त्यांनी वडगाव शेरीतील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. त्यांच्या रूपाने वडगाव शेरीत विकासाचे नवे पर्व सुरू होईल, असा दमदार उमेदवार विधानसभेत गेला पाहिजे."

त्यांनी भाजप सरकारवरही जोरदार टीका केली. ते म्हणाले, "राज्यातील सध्याचे सरकार चुकीच्या मार्गाने सत्तेवर आले असून चुकीच्या कामाने चालत राहिले. त्यामुळे राज्य २० वर्ष मागे पडले आहे. हे सरकार केवळ घोषणाबाजी करते; मात्र, प्रत्यक्षात जनतेच्या समस्या सोडवण्यात अपयशी ठरले आहे. विकास फक्त कागदावर आहे, पण त्याचा लाभ सामान्य लोकांना मिळालेला नाही. समाजा-समाजात आणि धर्मा-धर्मात लढाया लावून भाजप सरकार स्वतःच्या भाकऱ्या भाजत असून त्यांचा सुपडा साफ केला पाहिजे."

### वडगाव शेरीला मॉडर्न विकासाचे मॉडेल करू : बापूसाहेब पठारे यांचा निर्धार

» सभेत बापूसाहेब पठारे यांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, "आपण काय करतो आहोत याचे भान नसणारे उमेदवार या मतदारसंघात आहेत. त्यांनी हा मतदारसंघ राज्यात बदनाम केला. मी निवडून आल्यावर वडगाव शेरीची मान खाली जाऊ देणार नाही आणि वडगाव शेरीला मॉडर्न विकासाचे मॉडेल करू. पाण्यासाठी आंदोलन करून, लॉकअपमध्ये जाऊन, वास मारणारी भाकरी खाणारा, मी कार्यकर्ता आहे, कमी पडणार नाही. वडगाव शेरीच्या जनतेने मला नेहमीच विश्वास दिला आहे. या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. माझा एकमेव उद्देश हा वडगाव शेरीचा विकास साधणे आहे आणि त्यासाठी मी सातत्याने कार्यरत राहीन." परांडेनगर येथे झालेल्या या सभेला मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित होते. लोकांनी पठारे यांना पाठिंबा दर्शवत घोषणाबाजी केली. या सभेमुळे वडगाव शेरीतील निवडणूक प्रचाराला अंतिम टप्प्याची गती प्राप्त झाली. वडगाव शेरीत रंगतदार लढत होण्याची चिन्हे असून बापूसाहेब पठारे यांचा प्रचार जोरदार गतीने आघाडीवर आहे.

# फ्लेमिंगोंनी खुलले उजनीकाठचे सौंदर्य

## सुमारे 50 हून अधिक संख्येने फ्लेमिंगो पक्षी धरण परिसरात दाखल : पर्यटकांमध्ये उत्साह

**पुणे | प्रतिनिधी**

उजनी धरणाचे (यशवंत सागर) खास आकर्षण असलेले फ्लेमिंगो अर्थात रोहित पक्ष्यांचे नुकतेच येथे आगमन झाले आहे. याबाबतची नोंद पक्षिअभ्यासकांनी केली आहे. सुमारे ५० हून अधिक संख्येने आलेले फ्लेमिंगो पक्षी धरण परिसरातील पळसदेव येथील शिंदेवस्ती, काळेवाडी आदी शिवारातील पाणीफुगवठ्यावर येऊन दाखल झाल्याची माहिती स्थानिक पक्षिमित्रांनी दिली आहे. फ्लेमिंगोंच्या आगमनामुळे पक्षिअभ्यासक व उजनी जलाशयावर भ्रमंती करणाऱ्या पर्यटकांमध्ये उत्साह संचारला आहे.



या वर्षी संपूर्ण पावसाळ्यात धरणाच्या लाभक्षेत्रात विपुल प्रमाणात पाऊस पडल्यामुळे धरण काठोकाठ भरले. स्थलांतरित पक्ष्यांचा चराऊ भाग पाण्याखाली गेल्यामुळे प्रवासाचे वेळापत्रक बदलून पक्षी आपले आगमन लांबणीवर टाकतील, असे वाटत असताना नियोजित वेळापत्रकात बदल करून यंदा लवकरच रोहित पक्षी आल्यामुळे पक्षिअभ्यासक संभ्रमात पडले आहेत. या वर्षी पोषक वातावरण निर्माण झाल्यामुळे हे प्रवासी पक्षी लवकर आल्याचा अंदाज पक्षिअभ्यासक व्यक्त करत आहेत.

युरोपीय देशांमध्ये मूळ वास्तव्याला असलेले हे दिमाखदार रोहित पक्षी हिवाळ्यापूर्वी भारत व पाकिस्तान या देशांच्या सीमेवरील गुजरातच्या कच्छ भागात वीण घालतात. या ठिकाणी नवीन पिढीला जन्म घातल्यानंतर नवजात फ्लेमिंगोंनी खुलले उजनीकाठचे सौंदर्य

पिलांसह भारताच्या प्रवासावर निघतात. भारतात येणारे फ्लेमिंगो दोन प्रकारचे असतात. ते म्हणजे ग्रेटर फ्लेमिंगो व लेसर फ्लेमिंगो. उजनीवर फक्त ग्रेटर फ्लेमिंगो असतात.

> उजनीवरील विविध पक्ष्यांचे निरीक्षण व नोंदी घेण्यासाठी कित्येक वर्षांपासून उजनीच्या पाणलोटक्षेत्रावर फिरत आहे. स्थलांतरित पक्षी नेहमी हवामानाचा अंदाज घेत धरण परिसरात येत असतात. त्यापैकी फ्लेमिंगो हे नेहमी ठरलेल्या वेळापत्रकानुसार ठरलेल्या वेळेतच येऊन दाखल होत होते. मात्र, गेल्या दशकापासून वातावरणातील अस्थिरतेमुळे या पक्ष्यांचे नियोजित वेळापत्रक कोलमडून ते कधी लवकर तर कधी उशिरा येतात.
>
> - डॉ. अरविंद कुंभार, ज्येष्ठ पक्षी व पर्यावरण अभ्यासक.